## प्रेसनोट दि.१४/०७/२०१८
## हांडेवाडी येथील लॉजवर छापा
## २ अल्पवयीन व १ सज्ञान मुलीची वेश्या व्यवसायतुन सुटका
## महिला एजंट व लॉज मॅनेजर अटकेत

दि.१३/७/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना रेस्क्यु फाऊन्डेशन, पुणे, या स्वयंसेवी संस्थे तर्फे माहीती मिळाली की, महिला नामे शबाना इलाही दखनी व राज हे दोघे हडपसर भागातील हांडेवाडी येथील सौरभ संगम या लॉजमध्ये अल्पवयीन मुलींना ठेवुन त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी व हडपसर पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक श्री.सुनिल तांबे व कर्मचारी व रेस्क्यु फाऊन्डेशन, पुणे कडील स्टाफ यांनी संयुक्त कारवाई करून हांडेवाडी परिसरातील सौरभ संगम लॉज, गट नंबर ४६५/१, हांडेवाडी हडपसर रोड, हडपसर पुणे या लॉजमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान महाराष्ट्र राज्यातील २ अल्पवयीन मुली व १ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारी महिला एजंट - शबाना इलही दखनी वय ३० वर्षे रा. शिवनेरी नगर, पुजा मंगल कार्यालय जवळ, कोंढवा पुणे, व लॉज मॅनेजर- यासीन इब्राहिम साहेब वय ३६ वर्षे धंदा नोकरी रा. सौरभ संगम हॉटेल, हांडेवाडी हडपसर पुणे मुळ रा. कापु उडपी जिल्हा उडपी कर्नाटक राज्य याचे विरुध्द हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ८१८/२०१८, पिटा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,५,६ सह भादंवि कलम ३७०, ३७० अ.३४ सह पोक्सो ॲक्ट ४,७,१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. १६५००/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु फौंडेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.गायकर, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, पोउनि योगिता कुदळे, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, प्रमोद म्हेत्रे, नितीन लोंढे, तुषार आल्हाट, सुनिल नाईक, रेवनसिध्द नरुटे, कविता नलावडे, गीतांजली जाधव, सुप्रिया शेवाळे, अनुराधा ठोंबरे, रुपाली चांदगुडे,सचिन शिंदे यांनी व हडपसर पोलीस स्टेशनचे व.पो.नि. श्री. सुनिल तांबे व त्यांचे स्टाफसह संयुंक्तीक कारवाई केली आहे.